स.भु.कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद

# MAHADBT PORTAL भारत सरकार शिष्यवृत्ती (GOI SCHOLARSHIP)

## समाज कल्याण विभाग व आदिवासी विकास प्रकल्प विभाग अंतर्गत शिष्यवृत्ती योजना

(सन २०२२-२०२३ साठी)

## महत्वाची सूचना

दिनांक: २६/०९/२०२२

जात प्रवर्ग- SC, ST, OBC, VJNT, SBC.

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील ११वी,१२वी,एच.एस.व्ही.सी.,पदवी व पदव्युत्तर विभागातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार पोस्ट-मॅट्रीक शिष्यवृत्ती व Tuition Fees and Examination Fees (Freeship) या योजनेचा लाभ महाविद्यालयातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा, यासाठी सन २०२२-२०२३ मध्ये प्रथम वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांनी **नविन** शिष्यवृत्ती **(Fresh)** आणि द्वितीय व तृतीय वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे **नुतनीकरण (Renewal)** ऑनलाईन (**Online**) पध्दतीने अर्ज करावे. शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज **Mahdbt Portal** वर **https://mahadbtmahait.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन (Online) भरुन विहीत कागदपत्रासह हार्ड कॉपी महाविद्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

**विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १७.१०.२०२२ ही आहे.**

सन २०२२-२०२३ मध्ये प्रवेशीत मागास प्रवर्गातून ज्या विद्यार्थ्यांनी फी सवलतीत प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे अनिवार्य आहे. फीस सवलत घेणारे विद्यार्थी / विद्यार्थीनी शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणार नाहीत या विद्यार्थ्यांचे प्रवेश वर्ष अखेरी संपूर्ण फीस मध्ये करण्यात येते. याची संबंधीत विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**Mahadbt Portal** वर ऑनलाईन (**Online**) शिष्यवृत्तीचे अर्ज भरतांना खाली नमुद केलेले महाविद्यालयाचे नाव संकेतस्थळावरुन अचुक निवडकरुन शिष्यवृत्ती फॉर्म भरावे. महाविद्यालयाचे नाव चुकीचा निवडकरुन शिष्यवृत्ती अर्ज भरला असेल तर विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती अर्ज रद्द (Cancel) करुन नवीन शिष्यवृत्ती अर्ज भरावे लागेल.

संकेतस्थळवरील महाविद्यालयाचे नावः

**Junior College Name:- SBES College of Arts & Commerce, Aurangabad**

**HSVC College Name:- S.B. ARTS & COMMECE COLLEGE, AURANGABAD**

**Senior College Name:- S.B.E.S. College Of Arts & Commerce**

### विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरतांना बँक तपशील भरण्याबाबत सूचना

१. विद्यार्थ्याचा खाते क्रमांक (Core Bank Facility) असलेल्या (Scheduled) बँकेचाच असणे आवश्यक आहे.
२. त्यानंतर विद्यार्थ्याने त्यांचा बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी.कोड अचूक भरावा. विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँकेकडून खात्री करुन घ्यावी.
३. बँक पासबुकच्या पहिल्या पनाची ज्यावर फोटोसह खातेदाराचे नाव, पत्ता, खाते क्रमांकाची छायांकित प्रत ऑनलाईन अपलोड करुन अर्ज भरावा.
४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी (Link) संलग्न असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.
५. केंद्रशासनाच्या सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्याचे बँक तपशिल चुकीचे असतील अथवा त्यांच्या बँकेने त्यांचे बँक खाते प्रमाणित केले नाही तर त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झालेली असेल तरी विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती रक्कम जमा होणार नाही / रद्द होईल.
६. विद्यार्थ्याचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

अर्जदाराला खालील कागदपत्रे देणे अनिवार्य असतील.

❖ **अर्जदार हा भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.**

१. अर्जदार यांचा जातीचा दाखला. (छायांकित प्रत)

२. अर्जदाराची जात पडताळणी प्रमाणपत्र - आवश्यक असल्यास (छायांकित प्रत)

३. सक्षम प्राधिकारी (मा.तहसीलदार) यांनी दिलेला रहिवासी/अधिवास प्रमाणपत्र (Domisile Certificate). छायांकित प्रत.

४. अर्जदार पालकाचे सक्षम प्राधिकारी (मा.तहसीलदार) यांचे उत्पन्न प्रमाणपत्र **सन २०२१-२२ (मूळ प्रत)** / अर्जदार विवाहीत असेल तर पती / पत्नी यांचे **उत्पन्न प्रमाणपत्र सन** २०२१-२०२२ मूळ प्रत)

५. शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला/एल.सी/टी.सी. (छायांकित प्रत)

६. गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका. (छायांकित प्रत)

७. अर्जदाराचा शिक्षणात खंड असेल तर गॅप प्रमाणपत्र. (मूळ प्रत)

८. अर्जदाराने महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या वर्गाची फी भरलेली प्रवेश पावती. (छायांकित प्रत)

९. आवश्यक असल्यास अर्जदाराचे आधार कार्ड. (छायांकित प्रत)

१०. अर्जदाराचा राष्ट्रीयीकृत बँक खाते असलेल्या पासबुकची प्रथम पृष्ठाची. (छायांकित प्रत)

११. पालकाने भरुन द्यावयाचे दोन मुलांचे कुटूंब घोषणपत्र. (Decleration Certificate)

१२. शासकीय वसतिगृहामध्ये राहत असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र

१३. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.

**शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेलच असे नाही. शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थीच शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील.**

**टीप** - शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टल वर नोंदणी करतांना आधार नंबर टाकल्यावर जो मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक आहे. त्या मोबाईल नंबर वर OTP येईल. ज्या विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक नाही या विद्यार्थ्यांनी त्वरित आपल्या जवळच्या आधार सुविधा केंद्रात जाऊन आपला मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक करुन घ्यावा नसता आपला युजर आयडी तयार होणार नाही. **शिष्यवृत्तीची नोंदणी झल्यानंतर आपला युजर आयडी आणि पासवर्ड डायरीत नोंद करुन ठेवावे** याची शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

| Name of Course | Aided Division | Unaided Division |
|---|---|---|
| B.A | A | B |
| B.Com. | A, B, C | D, E |
| M.Com. | A, B | C, D |
| BBB, BCA | .... | A |
| 11th 12th Arts, Commerce, HSVC | A, B, C, D, F, G | 11th 12th 'E' |

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी मुळ कागदपत्र Orignal Document 100 kb to 150 kb JPJ किंवा PDF Format मध्ये स्कॅन करुन Soft Copy Pen drive मधे सोबत ठेवावी.

ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सबमीट करण्याअगोदर आपण भरलेली माहीती बारोबर आहे की नाही याची खात्री झाल्यावरच सबमीट करावे. Course Type मध्ये आपला प्रवेश अनुदानित (Aided) आहे का विनाअनुदानित (UnAided) आहे हे Select करुन Fee Paid = 0.00 करावे.

I / C PRINCIPAL
SBES COLLEGE OF ARTS & COMMERCE
Aurangabad

स.भु.कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद
आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (इबीसी) विद्यार्थ्यांनसाठी
MAHADBT PORTAL उच्च शिक्षण विभाग अंतर्गत
**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२०२३ वर्ष**

## !!महत्वाची सूचना!!

दिनांक - २६/०९/२०२२

महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यासाठी **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती** या योजनेचा लाभ महाविद्यालयातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा, यासाठी सन २०२२-२०२३ मध्ये प्रथम वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांनी **नविन** शिष्यवृत्ती **(Fresh)** आणि द्वितीय व तृतीय वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे **नुतनीकरण (Renewal)** ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावे. शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज **Mahdbt Portal** वर **https://mahadbtmahait.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन (Online) भरुन विहीत कागदपत्रासह हार्ड कॉपी महाविद्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

सन २०२२-२०२३ मध्ये प्रवेशीत ज्या विद्यार्थ्यांनी **ई.बी.सी. फी सवलतीत** प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांनी **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा** अर्ज भरणे अनिवार्य आहे. फीस सवलत घेणारे विद्यार्थी / विद्यार्थीनी ई.बी.सी. शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणार नाहीत या विद्यार्थ्यांचे प्रवेश वर्ष अखेरी संपूर्ण फीस मध्ये करण्यात येते. याची संबंधीत विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**Mahadbt Portal** वर ऑनलाईन **(Online)** शिष्यवृत्तीचे अर्ज भरतांना खाली नमुद केलेले महाविद्यालयाचे नाव संकेतस्थळावरुन अचुक निवड करुन शिष्यवृत्ती फॉर्म भरावे. महाविद्यालयाचे नाव चुकीचा निवड करुन शिष्यवृत्ती अर्ज भरला असेल तर विद्यार्थ्याला स्वतः संबंधीत महाविद्यालयात जाऊन शिष्यवृत्ती अर्ज माघारी घण्यासाठी विनंती करावी लागते.

**विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १७.१०.२०२२ ही आहे.**

संकेतस्थळावरील महाविद्यालयाचे नावः-

**Senior College Name:- S.B.E.S. College Of Arts & Commerce**

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरतांना बँक तपशील भरण्याबाबत सूचना

१. विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक (Core Bank Facility) असलेल्या (Scheduled) बँकेचाच असणे आवश्यक आहे.
२. त्यानंतर विद्यार्थ्याने त्यांचा बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी.कोड अचूक भरावा. विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँकेकडून खात्री करुन घ्यावी.
३. बँक पासबुकच्या पहिल्या पनाची ज्यावर फोटोसह खातेदाराचे नाव, पत्ता, खाते क्रमांकाची छायांकित प्रत ऑनलाईन अपलोड करुन अर्ज भरावा.
४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी (Link) संलग्न असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.
५. केंद्रशासनाच्या सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्यांचे बँक तपशिल चुकीचे असतील अथवा त्यांच्या बँकेने त्यांचे बँक खाते प्रमाणित केले नाही तर त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झालेली असेल तरी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम जमा होणार नाही / रद्द होईल.
६. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

Registrar.
Notice Board
website
Telegram channel

I / C PRINCIPAL
SBES COLLEGE OF ARTS & COMMERCE
Aurangabad

## योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी अटी व शर्ती :-

१. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची **उत्पन्न मर्यादा रुपये ८.०० लाख** इतकी आहे.

२. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर शिष्यवृत्ती साठी शासनाने विहीत केलेल्या अटी व **शर्तीचे अवलोकन करुनच** अर्ज सादर करावा.

३. **सदर याजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल. (पालकाचे स्वयम घोषित अपत्य प्रमाणपत्र सादर करणे अत्यआवशक आहे.)**

४. सरद योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी किमान ५०% उपस्थिती आवश्यक आहे.

५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित खातेवर थेट जमा करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये विहीत ठिकाणी राष्ट्रीयकृत बँक खाते बाबत माहिती तसेच आधार क्रमांकाबाबतची माहिती अचूक भरावी.

६. अपूर्ण/चुकीची माहिती भरलेले तसेच अंतिम मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा शिष्यवृत्तीसाठी विचार **केला** जाणार नाही. सदर योजनेचा लाभ हा चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच घेता येईल.

७. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र प्रत्येक इच्छुक लाभार्थ्याने अर्जासमवेत सादर **करणे** आवश्यक आहे.

८. **शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेलच असे नाही. शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्ण करणारे विद्यार्थीच शिष्यवृत्तीसाठी पात्र** ठरतील.

९. सरद प्रयोजनार्थ लाभाकरिता दरवर्षी अर्ज करताना त्यासंबंधीत शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र विचारत घेऊन किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## अर्जदाराला खालील कागदपत्रे देणे अनिवार्य असतील.

अर्जदार हा भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

१. रहिवासी/अधिवास प्रमाणपत्र (Domisile Certificate). छायांकित प्रत.
२. अर्जदार पालकाचे सक्षम प्राधिकारी (मा.तहसीलदार) यांचे उत्पन्न प्रमाणपत्र सन २०२१-२२ **(मूळ प्रत)** / अर्जदार विवाहीत असेल तर पती / पत्नी यांचे उत्पन्न प्रमाणपत्र सन २०२१-२०२२ मूळ प्रत)
३. शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला/एल.सी/टी.सी. (छायांकित प्रत)
४. गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका. (छायांकित प्रत)
५. अर्जदाराचा शिक्षणात खंड असेल तर गॅप प्रमाणपत्र. (मूळ प्रत)
६. अर्जदाराने महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या वर्गाची फी भरलेली प्रवेश पावती. (छायांकित **प्रत**)
७. आवश्यक असल्यास अर्जदाराचे आधार कार्ड. (छायांकित प्रत)
८. अर्जदाराचा राष्ट्रीयीकृत बँक खाते असलेल्या पासबुकची प्रथम पृष्ठाची. (छायांकित प्रत)
९. पालकाने भरुन द्यावयाचे दोन मुलांचे कुटूंब घोषणपत्र. (Decleration Certificate)
१०. शासकीय वसतिगृहामध्ये राहत असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र
११. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.

शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळेलच असे नाही. शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्ण करणारे विद्यार्थीच शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील.

**टीप** - शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टल वर नोंदणी करतांना आधार नंबर टाकल्यावर जो मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक आहे. त्या मोबाईल नंबर वर OTP येईल. ज्या विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक नाही या विद्यार्थ्यांनी त्वरित आपल्या जवळच्या आधार सुविधा केंद्रात जाऊन आपला मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक करुन घ्यावा नसता आपला युजर आयडी तयार होणार नाही. **शिष्यवृत्तीची नोंदणी झल्यानंतर आपला युजर आयडी आणि पासवर्ड डायरीत नोंद** करुन ठेवावे याची शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

दिनांकः २८/०९/२०२२

I / C PRINCIPAL
प्राचार्य
SBES COLLEGE OF ARTS & COMM...
Aurangabad